स्थायी आदेश- "ग्रामपंचायत निवडणुकीच्या कामकाजाबाबत विभागीय आयुक्त स्तरावर नोडल अधिकारी म्हणून उप आयुक्त (सामान्य) यांची नेमणूक"

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :- रानिआ/स्था.आ./ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१३/का.८
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २१ जुलै, २०१७

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)

विषय :- ग्रामपंचायत निवडणुकीच्या कामकाजाबाबत विभागीय आयुक्त स्तरावर नोडल अधिकारी म्हणून उप आयुक्त (सामान्य) यांची नेमणूक करण्याचे आदेश निर्गमित करण्याबाबत

महोदय,

आपणास माहित आहे की, माहे सप्टेबर-ऑक्टोबर २०१७ मध्ये राज्यात मुदत संपणाऱ्या सुमारे ८५०० ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम नियोजित आहे.

२. राज्य निवडणूक आयोगाचे दिनांक १०/०२/२०१५ च्या आदेशान्वये ग्रामपंचायत निवडणूका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी व नोडल अधिकारी (उपजिल्हाधिकारी,सामान्य/निवासी उपजिल्हाधिकारी) यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे.

३. ग्रामपंचायत निवडणुकांची मोठी संख्या तसेच या निवडणुकांची वारंवारता लक्षात घेता ग्रामपंचायतींच्या प्रभाग रचनेच्या टप्प्यापासून ते सदस्य अनर्हतेविरुध्दचे अपीलापर्यंत इ.कामकाजाचे विभागीय पातळीवर संनियंत्रण करणे गरजेचे असल्यामुळे यासाठी विभागीय आयुक्त यांच्या स्तरावर नोडल अधिकारी नेमणे आवश्यक असल्याने यासंबंधात उप आयुक्त (सामान्य) यांची पदसिध्द नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात यावी.

४. ग्रामपंचायत निवडणुकांची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी व जिल्हयातील संबंधित नोडल अधिकारी यांची असली तरी संनियंत्रण अधिकारी म्हणून त्यांच्याकडून आयोगाच्या निर्देशानुसार सर्व कामे करुन घेण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त व उप आयुक्त (सामान्य) तथा नोडल अधिकारी यांची राहील.

उदा.-

(i) प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम व मतदार यादी कार्यक्रमाचा विभागीय पातळीवर आढावा घेणे तसेच आयोगाच्या निर्देशानुसार सदर कार्यक्रमाच्या स्थानिक पातळीवरील अंमलबजावणीचा आढावा घेणे.

(ii) वरील कार्यक्रमासंदर्भात प्रशिक्षणाची विभागीय पातळीवर व्यवस्था करणे.

(iii) प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रमाची पूर्वतयारी- निवडणूक निरीक्षक नियुक्ती, आचारसंहिता इ. बाबत जिल्हाधिकारी कार्यालयांचा आढावा घेणे.

(iv) महिला सक्षमीकरण तसेच मतदार जागृती संदर्भात विभागीय कार्यक्षेत्रात येणारी विद्यापीठे व त्यांच्या अधिनस्त असलेली महाविद्यालये, जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये समन्वय साधणे.

(v) ग्रामपंचायत निवडणुकीबाबत विविध अनर्हतेसंदर्भात प्रलंबित अपिलांबाबत मा.विभागीय आयुक्त यांचे आदेश प्राप्त करुन घेणे.

५. नजिकच्या काळात मोठया प्रमाणात होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, वरील प्रकरणी नोडल अधिकारी नियुक्तीसंदर्भात आपल्या स्तरावर तातडीने आदेश निर्गमित करून त्याची प्रत आयोगास सादर करावी, ही विनंती.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपली,

(री. वि. फणसेवर)
अवर सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १) सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-१
२) जिल्हाधिकारी (सर्व)
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
४) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
५) निवड नस्ती

C:\Suman Arolkar\GP\Nodal Officer.docx